महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
४था मजला, प्रकाशगड, स्टेशन रोड, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०० ०५१
Tel.: 2642 2211 / 2647 2131 Tlx.: 011-78293 / 94 MSEB IN Fax : 022-26476749 Gram : MUMBAIGRID Mumbai
Email : gmntestt@mahadiscom.in website : www.mahadiscom.in

का.सं.(मा.सं.)/वितरण/हिं.अ-२०१०/नागपूर/३५५०४
दिनांक - २४/११/२०१०

# परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र विधान मंडळाचे नागपूर येथे दि.१ डिसेंबर २०१० पासून सुरु होणारे हिंवाळी अधिवेशन.**

**संदर्भ :-** १.मु.अ.(वितरण)/ग्रा.वि-२/२०१०-२/२१६०१ दि.०७.०७.२०१०
२. मु.अ./वितरण/ग्रा.वि-२/अधिवेशन-२०१०/१७०० दि.२३.११.२०१०

महाराष्ट्र विधान मंडळाचे २०१० सालातील तिसरे अधिवेशन नागपूर येथे दिनांक ०१.१२.२०१० पासून सुरु होत आहे. दिनांक २२/११/२०१० रोजी प्रकाशगड, मुंबई येथे मा.संचालक (संचालन) व मा.संचालक (प्रकल्प) यांचे संयुक्त अध्यक्षतेखाली अधिवेशन कामकाजासंबंधी आढावा बैठक संपन्न झाली. त्यावेळी मा. संचालक (संचालन) व मा.संचालक (प्रकल्प) यांनी संयुक्तपणे अधिवेशन काळात मा.मंत्री महोदयांसोबत पूर्व चर्चेच्या वेळी खालीलप्रमाणे काम करण्याची पद्धत अंमलात आणण्याचे ठरविले आहे.

१. अधिवेशन काळात संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी आपल्या कामात तत्पर राहून कार्यालयीन वेळेत व गरज भासल्यास कार्यालयीन वेळेआधी / नंतर तसेच सुट्टीच्या दिवशी सुद्धा उपस्थित राहावे. तसेच पूर्वपरवानगी शिवाय मुख्यालय सोडू नये, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची अनिवार्य कारण असल्याशिवाय रजा मंजूर करण्यात येऊ नये. संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी आपले दूरध्वनी / भ्रमणध्वनी चालू स्थितीत असल्याची खबरदारी घ्यावी.

२. अधिवेशनात उपस्थित होणा-या प्रश्नाबाबत मा.मंत्री महोदयांसोबत पूर्व चर्चेच्या वेळी ज्या खात्याशी/ प्रादेशिक कार्यालयाशी विषय संबंधित आहे त्या अधिक्षक अभियंता अथवा त्यांचे वरिष्ठांपैकी एकानेच उपस्थित राहणे आवश्यक आहे; इतर कोणत्याही अधिका-यास / कर्मचा-यास सोबत आणावयाचे नाही याची काळजी घेण्यात यावी.

३. मा.मंत्री महोदयांसोबत ठरविलेली पूर्व चर्चेची वेळ व स्थळ हे प्रकाशगड / हॉंगकॉंग बँक इमारत, मुंबई तसेच नागपूर (शहर परिमंडळ) नागपूर नियंत्रण कक्षातून संबंधीतांना कळविण्यात येईल. तथापि, मा.मंत्री महोदयांसोबत चर्चेच्या अगोदर संबंधीतांनी आपल्या संबंधीत संचालक यांना सर्व माहिती देण्यासाठी नियोजीत ठिकाणी हजर राहणे आवश्यक आहे.

४. वरीलप्रमाणे, पूर्व चर्चेसाठी येताना संबंधीतांनी प्रश्नांबाबतची तसेच प्रश्नाच्या अनुषंगाने येणारे प्रश्न याबाबतीतील पूरक माहिती बुलेट पॉईंटसह सोबत आणावी; जेणेकरुन मा.मंत्री महोदयांना विधानसभा/ विधानपरिषदेत आपला मुद्दा / उत्तर योग्य प्रकारे मांडता येईल.

सदर बाबींचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कंपनीच्या नियमाप्रमाणे करवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

राहुल गोवर्धन
कार्यकारी संचालक (मा.सं.)

**प्रत सविनय सादर-**

१. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
२. संचालक (संचालन), म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
३. संचालक (वित्त), म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
४. संचालक (प्रकल्प), म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई

प्रत सस्नेह सादर -

१. संचालक (दक्षता व सुरक्षा), म.रा.वि.वि.कं.मर्या. हॉंगकॉंग बँक इमारत, मुंबई
२. कार्यकारी संचालक (प्रकल्प), म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
३. कार्यकारी संचालक (वाणिज्य), म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
४. कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
५. प्रादेशिक कार्यकारी संचालक -१, म.रा.वि.वि.कं.मर्या., कल्याण.
६. प्रादेशिक कार्यकारी संचालक -२, म.रा.वि.वि.कं.मर्या., पुणे.
७. प्रादेशिक कार्यकारी संचालक -३, म.रा.वि.वि.कं.मर्या., नागपूर.

प्रत रवाना -

१. मुख्य अभियंता (वितरण) / पायाभूत आराखडा / वाणिज्य / भार व्यवसथापन / गतीमान उर्जा विकास व सुधारणा कार्यक्रम / अंतर्गत सुधारणा / वीज खरेदी / चाचणी / वितरण विशेष प्रकल्प / भांडार व्यवस्थापन, म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
२. मुख्य अभियंता (सं. व सु.) परिमंडल, कल्याण / भांडूप / रत्नगिरी / पुणे / बारामती / कोल्हापूर /नाशिक / जळगांव / लातूर / नांदेड / अकोला / औरंगाबार / नागपूर (ग्रा) / नागपूर (श)
३. विशेष कार्य अधिकारी, व्यवस्थापकीय संचालकांचे कार्यालय, म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
४. मुख्य महाव्यवस्थापक (क.व.) / (तांत्रिक आस्थापना) / (निगम वित्त) / (निगम लेखा) / (माहिती व तंत्रज्ञान) / (सां.सं.), म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
५. कंपनी सचिव, म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
६. प्रमुख सल्लागार वितरण (फॅन्चायझी), म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
७. मुख्य प्रकल्प व्यवस्थापक (व्य.मा.प्र.), म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
८. अधीक्षक अभियंता, वीज दर नियामक कक्ष, म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
९. मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.सांघिक कार्यालय, मुंबई
१०. सर्व अधिक्षक अभियंते, सं.व.सु.मंडल कार्यालये, म.रा.वि.वि.कं.मर्या.
११. समन्वयक व संपर्क अधिकारी, नियंत्रण कक्ष, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रकाशगड / हॉंगकॉंग बँक इमारत, मुंबई / नागपूर (शहर परिमंडळ), नागपूर.